**महाराष्ट्र शासन**

**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनीक्रमांक०२२-२२८१०२२२ **Email ID : adg.trg.office@mahapolice.gov.in**

**अतितात्काळ**

क्रमाक: प्रशिक्षण/परीक्षा-२/जिल्हा पोलीस/रापोउपनि/०१/२०१४- १०६४ दिनांक ०१/०८/२०२४

संदर्भ :- पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडील क्र.पोमसं/३-अ/रापोउनि/अर्हता परिक्षा/२२/२०२२ दिनांक २४/०७/२०२४ चे ज्ञापन.

विषय : - जिल्हयातील /आयुक्तालयातील पोलीस हवालदार/ सहायक पोलीस उप निरीक्षक यांची राखीव पोलीस उप निरीक्षक पदाच्या पदोन्नतीसाठीची विभागीय अर्हता परिक्षा २०२४-२०२७ आयोजित करण्याबाबत.

*****

**परिपत्रक :-**

मुंबई पोलीस नियमावली भाग-१नियम १८० (३) व दुरुस्ती चिठ्ठी क्र.१२२ नुसार सन २०२४-२०२७ या वर्षाकरीता जिल्हयातील /आयुक्तालयातील पोलीस हवालदार/ सहायक पोलीस उप निरीक्षक यांची अंदाजे एकूण १०० राखीव पोलीस उप निरीक्षक रिक्त पदाच्या पदाच्या पदोन्नतीसाठीची विभागीय अर्हता परिक्षा अंदाजे २० सप्टेंबर २०२४ पर्यंत घेण्याचे प्रस्तावित आहे.

| | |
|---|---|
| (१) | पोलीस हवालदार पदावर दिनांक ३०/०४/२०२४ रोजी ४ वर्षे सेवा पुर्ण करणारे पोलीस हवालदार आणि सहायक पोलीस उप निरीक्षक या परिक्षेस बसण्यास पात्र ठरतील. |
| (२) | पोलीस शिपाई संवर्गात सध्या पोलीस विभागात नि:शस्त्र व सशस्त्र असे वेगवेगळे सवंर्ग अस्तित्वात राहिले नसल्याने सदर परिक्षेकरीता उमेदवारांच्या निवडीसाठी खालील बांबींची पुर्तता करणारे उमेदवार परिक्षेस बसण्यास पात्र ठरतील.<br>जिल्हा/आयुक्तालयाचे मुख्यालयात किंवा गार्ड डयूटी किंवा सेंट्री डयूटी / बिग्युलर /पोलीस प्रशिक्षण केंद्रात/वि.सु.वि./नक्षलग्रस्त परिसरात सशस्त्र डयूटीसाठी नेमणूक (Armed Post) तसेच जिल्हा/आयुक्तालयाच्या पोलीस दलात बदलून येण्यापूर्वी राज्य राखीव पोलीस बलामध्ये सेवेत असलेले इत्यादी ठिकाणी सशस्त्र सेवा म्हणून सलगपणे पोलीस हवालदार पदावर किमान ४ वर्षे सेवा झाली आहे. |
| (३) | शासनाने पोलीस विभागात पुरुष व महिला असे दोन वेगवेगळे संवर्ग न ठेवता त्यांचा एकच संवर्ग करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे महिला पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नतीसाठी स्वतंत्र परिक्षा न घेता पुरुष व महिला पोलीस हवालदारांची एकत्रित परिक्षा घेण्यात येईल. |
| (४) | **उमेदवाराने परिशिष्ट मधील आवेदन अर्ज २ प्रतीत भरुन त्यांच्या घटक कार्यालयाकडे सादर करावेत.या कार्यालयाकडे उमेदवारांचे परस्पर आवेदन अर्ज स्विकारले जाणार नाहीत. घटक कार्यालयाकडून पाठविण्यात येणारे उमेदवारांचे अर्ज चुकीच्या माहितीमुळे किंवा घटक प्रमुखाने माहिती स्वाक्षांकित केली नाही या कारणास्तव अवैध ठरल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी घटक** |

| | |
|---|---|
| | **प्रमुखांची राहील.घटक प्रमुख संपुर्ण माहिती तयार करुन सुचना फलकावर लावतील.सदरची यादी प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवारांकडून हरकती प्राप्त झाल्यास त्याचा विचार करुन अंतिम यादी दुस-या दिवशी सुचना फलकावर लावतील, घटक प्रमुखांनी सदरच्या याद्या संबंधीत केंद्र प्रमुख यांचेकडे पाठवाव्यात.केंद्र प्रमुख सदरच्या याद्या पोलीस महासंचालक यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करतील व या कार्यालयास पाठवतील.** |
| (५) | सदर परिक्षेसाठी उपरोक्त सर्व अटी/शर्ती व परीक्षेचे स्वरुप इत्यादी सर्व बाबी घटक प्रमुखांनी संबंधीत उमेदवारांच्या निदर्शनास न चुकता आणून द्याव्यात तसेच सदर परिक्षेसाठी विहित केलेल्या आवेदन अर्जाच्या आवश्यक प्रती काढून उमेदवारांना त्यांनी मागणी केल्यास त्या नि:शुल्क उपलब्ध करुन द्याव्यात.उमेदवारांकडून अर्जाच्या २ प्रती भरुन त्याची एक प्रत त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखावर ठेवून,फक्त एकच प्रत खाली नमुद केलेल्या संबंधीत केंद्र प्रमुखांकडे पाठवावी. |
| (६) | या कार्यालयाकडून अर्जाची तपासणी केली जाणार नाही.परिक्षेपुर्वी अथवा परिक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराने आर्जात नमुद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहीत अर्हतेची पुर्तता करीत नसल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांना कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबतचा या कार्यालाचा निर्णय अंतिम राहिल. |
| (७) | परिक्षेस बसण्यास इच्छूक असलेल्या सर्व पोलीस कर्मच्या-यांचे अर्ज त्यांचे संबंधीत घटक प्रमुखांकडे दि.२१.०८.२०२४ पर्यंत सादर करावेत.घटक प्रमुखांनी प्रमाणित केलेले अर्ज संबंधित केंद्र प्रमुख स्विकारतील. |
| (८) | परिक्षा केंद्र:-सदर परिक्षेचे केंद्र व केंद्रप्रमुख खालील प्रमाणे आहेत. |

| **अ.क्र.** | **परिक्षा केंद्र** | **परीक्षा केंद्र प्रमुख** |
|---|---|---|
| **(१)** | मुंबई | सह पोलीस आयुक्त,(प्रशासन),<br>पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई. |
| **(२)** | ठाणे | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवीमुंबई |
| **(३)** | कोल्हापूर | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र,कोल्हापूर |
| **(४)** | नाशिक | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| **(५)** | औरंगाबाद | विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद |
| **(६)** | नांदेड | पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड |
| **(७)** | अमरावती | विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती |
| **(८)** | नागपूर | विशेष पोलीस महानिरीक्षक, परिक्षेत्र,नागपूर |
| **(९)** | गडचिरोली | पोलीस उप महानिरीक्षक, परिक्षेत्र, गडचिरोली |

(९) घटक प्रमुख उमेदवारांची तपशिलवार माहिती संकलित करुन MS-EXCEL मध्ये TIMES NEW ROMAN मध्येच व विवरणपत्रामधील नमुण्यात टंकलित करुन प्राप्त झालेल्या अर्जासोबत संबंधित केंद्र प्रमुख यांच्याकडे दिनांक **२६/०८/२०२४** पर्यंत पाठवतील व त्याची एक प्रत या कार्यालयास पाठवतील दिनांक **२६/०८/२०२४**
नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया घटक प्रमुखांनी नोंद घ्यावी.इतर कोणत्याही प्रकारात आलेली माहिती (MS WORD इत्यादी ) स्विकारली जाणार नाही व त्याची जबाबदारी घटक प्रमुखांची राहील यांची सर्व घटक प्रमुखांनी नोद घ्यावी.

(१०) उमेदवार ज्या परिक्षेत्रात येतात त्या त्या परिक्षेत्रातील परिक्षा केंद्रातून बसतील प्रतिनियुक्तीवर कार्यरत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांचे मुळ घटका मार्फत सादर करावेत.सर्व उमेदवार त्यांचे मुळ घटकाप्रमाणे परिक्षा केंद्रावर परिक्षेस बसतील.

(११) उमेदवारांना आसन क्रमांक, प्रवेशपत्र,इत्यादी सबंधित केंद्र प्रमुख हे दिनांक **१५/०९/२०२४** पर्यंत देण्याची व्यवस्था करतील याबाबतीत कोणतीही शंका असल्यास उमेदवार संबंधित केंद्र प्रमुख यांचेशी संपर्क साधतील.सदर परिक्षेचा भाग-१ (लेखी परिक्षा ) **दिनांक २०/०९/२०२४** रोजी घेण्याचे प्रस्तावित आहे. प्रत्याक्षिक चाचणीचे वेळ व ठिकाण नंतर कळविण्यात येईल.

(१२) सदर परिक्षेचा अभ्यासक्रम खालील प्रमाणे आहे.

**भाग-१**

**लेखी परिक्षा**

| | |
|---|---|
| Accounts,Stores and office procedure in the Head Quarters,Office and general information. | १०० गुण |

**भाग-२**

**प्रात्याक्षिक चाचणी**

| | |
|---|---|
| १) Physical Training, musketry and drill of all types | १०० गुण |
| २) Ability to impart instrucation in (१) above | १०० गुण |

(१३) लेखी चाचणी ही १०० गुणांची व मैदानी चाचणी २०० गुणाची घेण्यात येईल.सदर लेखी चाचणीत किमान ५० % गुण मिळविणारे उमेदवार प्रात्याक्षिक चाचणीसाठी पात्र ठरतील. तसेच प्रात्याक्षिक चाचणीमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी ५० % गुण मिळविणे आवश्यक आहे.लेखी व प्रात्याक्षिक या दोन्ही चाचण्यांच्या एकूण ३०० गुणांपैकी ५० % (१५० गुण ) मिळविणारे उमेदवार उत्तीर्ण म्हणून घोषित केले जातील.

(१४) भाग-१ ची लेखी परिक्षा वस्तुनिष्ठ (Objective ) स्वरुपाची असेल.

(१५) सदर अर्हता परिक्षेत बसण्यासाठी उमेदवाराने कवायत निदेशकाचा (DDI)पाठयक्रम पुर्ण करणे अनिवार्य राहील. ज्या उमेदवारांनी सदरचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला नाही त्या उमेदवारांना कवायत निदेशक पाठयक्रम त्याची निवड झाल्यानंतर १ वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधन कारक राहिल.कवायत निदेशकाचा पाठयक्रम पुर्ण केल्याशिवाय त्यांना उप निरीक्षक पदावर नियमित पदोन्नती दिली जाणार नाही.सदरच्या अटींचा त्यांच्या सेवाज्येष्ठतेवर कोणताही परिणाम होणार नाही.

| | |
|---|---|
| (१६) | सदरच्या विभागीय अर्हता परिक्षेत पेपर फेरतपासणी नियमात विहीत नसल्याने फेरतपासणीचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. |
| (१७) | सदर परिक्षेच्या नियम,अटी,अभ्यासक्रम इत्यादी संदर्भात दुरुस्ती किंवा बदल करावयाचे झाल्यास किंवा याबाबत काही शासन आदेश झाल्यास असे बदल करण्याचे अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहेत व त्याबाबतचा या कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील. |
| (१८) | विभागीय अर्हता परिक्षेमध्ये उत्तीर्ण होणा-या उमेदवारांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त पदावर नियुक्ती दिली जाईल.मात्र त्यांची सेवाज्येष्ठता ठरविण्याच्यावेळी त्यांची पोलीस खात्यात भरती झाल्याची तारीख व त्यानंतर त्यांची जन्मतारीख व शासनाने वेळोवळी विहित केलेले नियमांच्या आधारे ठरविण्यात येईल. |
| (१९) | सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या वेबसाईट **www.mahapolice.gov.in** वर **RSI Recruitment -२०२४-२०२७** या सदराखाली उपलबध करुन देण्यात येत आहे. |

RAJKUMAR MARUTI VHATKAR

Digitally signed by RAJKUMAR MARUTI VHATKAR
Date: 2024.08.01 17:36:03 +05'30'

**(राजकुमार व्हटकर)**
अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त,(बृहन्मुंबई/लोहमार्ग,मुंबईसह )
सर्व पोलीस अधिक्षक (लोहमार्गासह)

२/- यांनी त्यांचे आस्थापनावरील इतरत्र प्रतिनियुक्तीवर असलेल्या सर्व पोलीस कर्मचा-यांनाही सदरची माहिती मिळाल्याची खात्री करावी.

**<u>प्रत योग्य त्या कार्यवाहीकरीता:-</u>**

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सादर)

अपर पोलीस महासंचालक, (लोहमार्ग) महाराष्ट्र राज्य, मुंबई

व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र पोलीस हौसिंग,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

महासंचालक,होमगार्ड महाराष्ट्र राज्य,मुंबई

अपर पोलीस महासंचालक, का. व सु. म.राज्य,मुंबई/ राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य, मुंबई
महामार्ग सुरक्षा पथक,म.राज्य,मुंबई/दहशदवाद विरोधी पथक,मुंबई
/ना.ह.स.म.राज्य,मुंबई/विशेष कृती,मुंबई//फोर्स वन, म. राज्य, मुंबई
/गुन्हे अन्वेशन विभाग, महाराष्ट्र राज्य,पुणे /नक्षल विरोधी अभियान,नागपूर.

. संचालक,महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र/अमरावती परिक्षेत्र/कोंकण परिक्षेत्र/ नांदेड परिक्षेत्र/कोल्हापूर परिक्षेत्र/ नाशिक परिक्षेत्र/संभाजीनगर परिक्षेत्र/लोहमार्ग परिक्षेत्र.

संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई /

विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे / मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विसुप्रशा, वडाची वाडी, पुणे/राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर

पोलीस उप महानिरीक्षक,गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र,मरोळ-मुंबई / खंडाळा/नागपूर/अकोला/जालना/नानवीज - दौड/सोलापूर/बाभळगांव- लातूर/धुळे/तासगांव-तुरची,सांगली/

प्राचार्य,अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र,नागपूर

प्राचार्य,गुन्हे अन्वेशन प्रशिक्षण केंद्र,नाशिक

सर्व समादेश,राज्य राखीव पोलीस बल गट १ ते १९

राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानविज.

प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक.

सह आयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती,पुणे/नाशिक/नंदुरबार/अमरावती/नागपूर/औरंगाबाद.

अधिक्षक,राज्य मानवी हक्क आयोग,मुंबई

सुरक्षा अधिकारी,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

## परीक्षा केंद्र:-

## परिशिष्ट - क

राखीव पोलीस उप निरीक्षक पदाच्या पदोन्नतीसाठीची विभागीय अर्हता परीक्षा उमेदवारांसाठी अर्जाचा नमुना:-

टिप :- आवेदनपत्र भरण्यापूर्वी घटकप्रमुखांना या कार्यालयाकडून कळविण्यात आलेल्या सूचना उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचाव्यात. अर्जातील माहिती उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात दोन प्रतीत काळजीपूर्वक भरावी. एकदा भरण्यात आलेल्या माहितीत बदल करण्यास परवानगी मिळणार नाही.

१) उमेदवाराचे आडनाव :- ------------------------------------------------------

२) उमेदवाराचे स्वत:चे नाव :- ------------------------------------------------------

३) उमेदवाराचे वडिलांचे नाव :- ------------------------------------------------------

४) उमेदवाराचा हुद्दा व बक्कल क्रमांक :- ------------------------------------------------------

५) कार्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------

६) मागासवर्गीय आहे काय? :- होय/नाही. जात :----------------पोटजात--------------
असल्यास जात/पोटजात नमूद करावी.

७) जन्मतारीख :- दिवस महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

८) सेवेत दाखल झाल्याचा दि. :-
दिवस महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

९) सशस्त्र पोलीस हवालदार/सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर सलग ४ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक :- दिवस महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

१०. जिल्हा कवायत निदेशक ( D.D.I) ची परीक्षा दिवस महिना वर्ष

उत्तीर्ण केल्याचा दिनांक:-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

११. प्रतिनियुक्तीवर आहात काय? :- होय / नाही.
असल्यास मूळ घटक नमूद करावा ------------------------------------------------------
दिनांक :-
ठिकाण :-

(उमेदवाराची स्वाक्षरी )

सूचना :- अर्जातील सर्व बाबींची माहिती उमेदवाराने भरणे आवश्यक आहे. उमेदवाराचे संबंधात एखादी बाब लागू नसल्यास त्या रकान्यासमोर " निरंक " असे नमूद करावे.मात्र कोरी जागा सोडू नये.अपूर्ण भरलेल्या अर्जाचा परिक्षेसाठी विचार केला जाणार नाही.त्याचप्रमाणे उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चूकीची आढळल्यास त्याचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

---

प्रमाणित करण्यात येत आहे की, बक्कल क्रमांक -----------------------------------श्री.-------------------------- ------------------------------------------------------------------------------------------यांनी अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती त्यांचे सेवा अभिलेखावरुन पडताळण्यात आली असून ती सेवा अभिलेखाप्रमाणे बरोबर व खरी आहे. त्याच प्रमाणे अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांनी त्यांचे दि.०१/०८/२०२४ च्या परिपत्रकान्वये कळविलेल्या सर्व सूचना सदर उमेदवाराचे निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. त्यांना माहे, सप्टेंबर-२०२४ मध्ये घेण्यात येणा-या विभागीय परिक्षेस बसण्यास परवानगी मिळावी म्हणून शिफारस करण्यात येत आहे.

कार्यालयाचा शिक्का :-

दिनांक :-

ठिकाण :-

घटक प्रमुखाची सही
(नाव)
(हुद्दा)

टिप:- या प्रमाणपत्रावर पोलीस अधीक्षक दर्जापेक्षा कमी दर्जाच्या अधिका-याची स्वाक्षरी ग्राहय धरली जाणार नाही. तसेच त्या अधिका-याकरिता केलेली स्वाक्षरी ही ग्राहय धरली जाणार नाही.